| MHRG060013512025 | **दिवाणी चौकशी अर्ज नं. १४९/२०२५ मधील निशाणी क्रमांक १ वरील आदेश.** |
| --- | --- |

**०१.** अर्जदार क्र. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कायद्याच्या तरतुदीनुसार हेअरशिप सर्टीफिकेट मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील कै. अविनाश गंगाधर वैशंपायन हे दि. १०/१०/२०२५ रोजी प्लॉट नं. ६१, फ्लॅट नं. ३, आशिर्वाद अपार्टमेंट, बिबवेवाडी, लोकेश को.ऑप.हौसिंग सोसायटी, पुणे शहर येथे मयत झाले आहेत. तसेच कै. अविनाश गंगाधर वैशंपायन यांची आई कै. इंदिरा गंगाधर वैशंपायन ह्या दि. १८/१२/१९८७ रोजी मयत झाल्या आहेत. सबब, अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. अविनाश गंगाधर वैशंपायन यांचे कायदेशीर वारस आहेत. तसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** या अर्जाच्या कामी नोटीस काढण्यात आली. सदरची नोटीस स्थानिक वृत्तपत्र रायगड वृत्तवेध मध्ये दि. ०५/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली. ती **नि.क्र.२१** कडे दाखल आहे. दि. ०५/१२/२०२५ पासून आजपर्यंत या अर्जाला कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही.

**०४.** या अर्जाच्या कामी कै. अविनाश गंगाधर वैशंपायन यांच्या मृत्यूच्या

दाखल्याची मुळ प्रत **नि.क्र.१२** कडे दाखल केलेली आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आधारकार्डच्या साक्षांकीत प्रती अनुक्रमे **नि.क्र.१३, नि.क्र.१५, नि.क्र.१७** व **नि.क्र.१९** कडे दाखल केल्या आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या रेशनकार्डच्या साक्षांकीत प्रती अनुक्रमे **नि.क्र.१४, नि.क्र.१६, नि.क्र.१८** व **नि.क्र.२०** कडे दाखल केल्या आहेत. अर्जदारातर्फे कै. इंदिरा गंगाधर वैशंपायन यांच्या मृत्यूचा दाखला उपलब्ध नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.२२** कडे दाखल केले आहे. अर्जदारातर्फे पुरावा संपल्याची पुरशीस **नि.क्र.२३** कडे दाखल केली आहे.

**०५.** अर्जदार यांनी या अर्जाच्या कामी **नि.क्र.११** वर आपला पुरावा नोंदविलेला आहे. अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन कै. अविनाश गंगाधर वैशंपायन यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारस असल्याचे चौकशीदरम्यान दिसून येत आहे. त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस असल्याचे दिसून येत नाही. बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ च्या अनुच्छेद ७ (२) प्रमाणे वारस प्रमाणपत्रावरुन कुठल्याही मिळकतीचे हक्क अथवा हस्तांतरण अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या हक्कात प्राप्त होत नाही. अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणतीही कायदेशीर बाधा नाही. सबब, अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदार क्र. १ ते ४ यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. **१. श्रीमती वंदना अविनाश वैशंपायन, २. श्री. अतुल अविनाश वैशंपायन, ३. श्री. आनंद अविनाश वैशंपायन** व **४. सौ. अंजली धनंजय मंडलिक** हे

**कै. अविनाश गंगाधर वैशंपायन** यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ४ यांना योग्य मुद्रांक भरल्यानंतर हेअरशीप सर्टीफिकेट अदा करण्यात यावे.

Note below heirship certificate as per Para 312 of Civil Manual:

" The person, to whom this certificate is granted, or his representative, is required, within six months from the date of this certificate, or within such further time as the Court may from time to time appoint, to exhibit in Court a full and true inventory of all the property and credits in his possession under this certificate, and also, within one year from the same date or within such further time as the Court may from time to time appoint, to render to the Court a true account of the said property and credits, showing the assets which have come to his hands and the manner in which they have been applied or disposed of."

SANGITA KISANRAO TONPE
Digitally signed by SANGITA KISANRAO TONPE
Date: 2026.03.12 17:21:12 +0530

पेण. (एस. के. टोनपे)

दिः १२.०३.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पेण.